नव्या भाषा, नव्या कल्पना

प्रथम बुक्स

वार्षिक अहवाल २३-२४

व्यवस्थापनाचा अहवाल

गोष्टी आणि वाचन यांचा आनंद लुटण्याचा अर्थपूर्ण प्रवास सुरू झाल्याला यावर्षी दोन दशके पूर्ण झाली. म्हणूनच प्रथम बुक्ससाठी हे वर्ष म्हणजे एक महत्त्वाचा, उत्सवी टप्पा आहे. 'प्रत्येक मुलाच्या हाती पुस्तक' हे ध्येय ठेवून, छोटी पावले टाकत सुरू झालेला हा प्रवास आता एका भल्यामोठ्या प्रकाशनसंस्थेत रूपांतरित झाला आहे — आमची संस्था गोष्टी सांगण्याच्या सीमा विस्तारते आहे, तंत्रज्ञानाच्या गतीशी जुळवून घेते आहे आणि या वेगवान, सतत बदलणाऱ्या पर्यावरणात आपली भूमिका योग्य प्रकारे पार पाडते आहे.

दोन दशके पूर्ण केल्यानंतर, आम्ही स्वतःला एक प्रश्न विचारला : कोणती गोष्ट मनाला भावते? गोष्ट नेमकी कशी सांगावी? मुलांना आनंद कशातून मिळतो? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याच्या प्रवासात आम्ही विविध नव्या माध्यमांशी जुळवून घेतले—गोष्टींची-पुस्तके, स्टोरी-कार्डे, तोंडी कथाकथन, मोबाइलवर मागणीनुसार ऐकवल्या जाणाऱ्या गोष्टी, तसेच इलेक्ट्रॉनिक माध्यमांवरील गोष्टी — थोडक्यात, ज्या गोष्टी वाचायला चांगल्या, ऐकायला मोहक आणि दिसायला आकर्षक आहेत त्या सर्व माध्यमांतून आम्ही उपलब्ध करून दिल्या. या सर्व गोष्टींसोबतच, आणखी एका महत्त्वाच्या बाबीकडे आम्ही सतत लक्ष दिले आहे : ती म्हणजे गोष्ट केवळ छान सांगितली गेली पाहिजे असे नाही, तर ती त्या मुलाच्या भावविश्वाच्या जवळच्या आणि समर्पक भाषेत सांगितली गेली पाहिजे, तरच ती खऱ्या अर्थाने मनाला भिडते.

आपण विचार करतो, स्वप्ने पाहतो आणि अंकांची गणनादेखील आपल्या मातृभाषेत करतो — बहुतांश वेळा भाषा इंग्रजी नसते. म्हणूनच, आपल्याला ज्या गोष्टी आपल्या स्वप्नांशी आणि विचारांशी सुसंगत असतील आणि आपल्या मातृभाषेत सांगितल्या जातील अशा गोष्टींची गरज आहे. प्रत्येक भाषेत स्वतःच्या संदर्भानुसार वाक्प्रचार, सांस्कृतिक वैशिष्ट्ये आणि सहज ओळखता येणाऱ्या विशिष्ट प्रतिमा असतात. आपल्या मातृभाषेतल्या गोष्टींमधली रूपके स्थानिक असतात, प्रतीके आपलीशी वाटणारी असतात आणि त्यामुळे त्या गोष्टींशी एक घट्ट नाते निर्माण होते. म्हणूनच उत्तम आशय आणि सादरीकरणाच्या सौंदर्यापलीकडे जाऊन मुलांसाठी समर्पक आणि त्यांच्या परिचयाच्या भाषांचा वापर करण्यावरही आम्ही भर देतो.

अनुवादांमुळे मुलांसाठी उपलब्ध होणाऱ्या गोष्टींची संख्या वाढते, पण त्यासोबत एक छोटीशी मर्यादादेखील येते — ती म्हणजे योग्य संदर्भ मुलांना समजणे आणि तरल भावनांना अचूक पकडणे. त्यामुळे, विविध भाषांमध्ये केवळ सामग्री उपलब्ध करून देणे, यापुरतीच आमची मर्यादित जबाबदारी असल्याचे आम्ही मानत नाही. आपल्या स्वप्नांच्या आणि विचाराच्या भाषेत मुलांना गोष्टी मिळाव्यात यासाठी अनुवादाच्या पलीकडे जाऊन, प्रादेशिक भाषांमध्ये गोष्टींच्या पुस्तकांची निर्मिती आम्ही करतो. थेट प्रादेशिक भाषांमध्ये लिहिलेली पुस्तके मुलांना अधिक समृद्ध अनुभव देतात.

या वर्षभरात, आम्ही ११ भाषांमध्ये २० पुस्तके आणि १० वॉल बुक्स अशी त्या त्या मूळ भारतीय भाषांमध्ये प्रकाशित केली आहेत. अनुवादांच्या बाबतीतही, आम्ही ८ पुस्तके एका भारतीय भाषेतून दुसऱ्या भारतीय भाषेत अनुवादित केली, तीदेखील इंग्रजीच्या मध्यस्थीशिवाय. तसेच, आम्ही बोडो, काश्मीरी आणि नेपाळी यांसारख्या १० भाषांमध्ये ८ अनुवाद कार्यशाळा आयोजित केल्या. सोबतच इंग्रजीखेरीज मुळातून भारतीय भाषांमध्ये लिहिलेल्या पुस्तकांची निर्मिती करून ती सर्व भाषांत उपलब्ध करून देण्यावर भर दिला आहे.

आम्ही मुलांसाठी अधिकाधिक स्थानिक, संदर्भसंपन्न आणि अर्थपूर्ण आशय सक्रियपणे तयार करत आहोत. त्याचवेळी स्टोरीविव्हरने याआधी कधीही न झालेल्या, अभिनव पद्धतीने आशयाचे रूपांतर आणि स्थानिकीकरण करण्यासाठी एक प्रभावी मंच उपलब्ध करून दिला आहे.

या मंचाने मुलांसाठी त्यांच्या स्वतःच्या भाषेत गोष्टी समजून घेण्याचा जादुई अनुभव खुला केला आहे. मग त्या मेघालयातील खासी, गारो आणि प्नार भाषेतील लोककथा असोत, छत्रपती संभाजीनगरमधील शाळांना दिलेली उर्दूतील रंगीबेरंगी चित्रपुस्तके असोत, किंवा गोव्यातील कोंकणी आणि मराठी भाषांमधले

वाचन उपक्रम असोत. आज, आम्ही करत असलेले सहयोगी संस्थांसोबतचे वाचन उपक्रम आणि प्रशिक्षण कार्यक्रम यांच्या माध्यमातून हा मंच आघाडीचे बहुभाषिक वाचन चळवळीचे केंद्र बनलेले आहे. ३६१ भाषांमधील ६०,००० गोष्टी या मंचावर उपलब्ध करून दिलेल्या आहेत. या ३६१ भाषांपैकी सुमारे ६०% भाषा आजवर दुर्लक्षित राहिल्या होत्या.

पुढच्या दशकात प्रवेश करत असताना, आमचा प्रयत्न मुलांसाठी आशय अधिकाधिक सुलभ करण्याचा असेल. हे साध्य करण्यासाठी भाषा हे एक महत्त्वाचे माध्यम आहे.

प्रथम बुक्सच्या संपूर्ण टीम आणि विश्वस्तांच्या वतीने,

प्रा. एम. एस. श्रीराम
विश्वस्त

अनेक गोष्टी, अनेक अभिव्यक्ती

पुस्तके जादुई असतात, ती वाचकाला अनोख्या जगात घेऊन जातात. त्याला नवी क्षितिजे दाखवतात. त्याच वेळी ती वाचकांना आत्ता आजूबाजूला काय चालले आहे, यावर मनन करायला प्रवृत्त करतात. ती जीवनातले सौंदर्य आणि क्लिष्टताही दाखवतात. वाचनाची सवय अंगवळणी पडण्यासाठी मुलाला वाढीच्या सुरुवातीच्या टप्प्यातच पुस्तके हाताळायला मिळायला हवीत. वाचनाच्या जगात घेऊन जाणारी पुस्तके गंमतीची असू शकतात, तशीच ती अर्थपूर्ण असतात. ती आजूबाजूच्या जगाशी नाते सांगणारी असतात, तशीच कल्पकही असतात. पुस्तकातले जग आणि शब्द यांमुळेच तर पुस्तकाची पाने जिवंत होतात आणि कल्पनेच्या भराऱ्या घेण्यासाठी वाचकांना प्रेरणा देतात.

यावर्षी आमच्या संपादकीय टीमने अनेक ग्रंथालये, शिक्षक यांसोबत देवाणघेवाण करून त्यांच्याशी झालेल्या चर्चेतून एक आराखडा बनवला. या आराखड्यामध्ये मातृभाषा, चित्रपुस्तके, शब्दविरहित पुस्तके, मुलींचे सक्षमीकरण, सामाजिक आणि भावनिक शिक्षण यांवरच्या पुस्तकांसोबतच अन्य कितीतरी मोठ्याने वाचून दाखवता येतील अशी पुस्तके तयार केली आणि प्रसिद्ध केली.

मागील वर्षी Read with me (रीड विथ मी) हा एक अभ्यासप्रकल्प हाती घेतला होता. त्यातून मोठ्याने वाचून दाखवता येतील अशा पुस्तकांची गरज लक्षात आली होती. त्यासोबतच मातृभाषेतील पुस्तकांची गरजही लक्षात आली होती. भारतीय बालगीते, बडबडगीते यांचा अभ्यास करून आमच्या टीमने बडबडगीतांवर आधारित असणाऱ्या दहा आगळ्यावेगळ्या पोस्टर्सचा संच मराठी, गुजराथी, तमिळ, मैतेई, मल्याळम, कोकणी, कोरा, आसामी, कन्नड आणि बंगाली भाषांमध्ये प्रसिद्ध केला. मातृभाषेची ओळख करून देणाऱ्या पुस्तकांमधले एक ठळक नाव म्हणजे लवलीन मिश्रा यांनी लिहिलेलं “तापाला कसं बरं पळवायचं?” या पुस्तकासाठी प्रिया कुरियन यांनी काढलेल्या चित्रांनी पुस्तकाला एक वेगळीच खुमारी आली.

नेहमीप्रमाणेच आमच्या टीमने उत्तमोत्तम लेखकांसोबत काम केले आणि अनेक नवनवीन पुस्तके निर्माण केली. त्या पुस्तकामध्ये उत्तम गोष्टीला योग्य त्या शब्दांची आणि चित्रांची जोड मिळाली आहे.

‘सूर्यास्त होतो तेव्हा’ (When the Sun Sets) या ओगिन नयम या जादूई शब्दविरहित पुस्तकात सूर्य अस्ताला गेल्यावर वाचकाला त्याच्या घरी बोलावतो आणि त्याच्या आयुष्यात डोकावून बघण्याची संधी देतो, अशी कल्पना मांडली आहे.

आपण कुणालातरी हवे आहोत. आणि आपल्याला कुणीतरी समजावून घेते आहे, या भावनेची मुलांना गरज असते. गोष्टी त्यांना अवघड भावनांना वाट काढून देण्यासाठी मदत करतात. या क्षेत्रात काम करणाऱ्या तज्ज्ञांकडून ज्या सूचना आल्या होत्या त्यातून *आशेचा प्रकाश* हे मातंगी सुब्रमणिअन यांनी लिहिलेले आणि प्रोईती रॉय यांनी चित्रांकन केलेले पुस्तक, तसेच यामिनी विजयन यांनी लिहिलेले, ऐंद्री सी. यांनी चित्रे काढलेले *‘वयात येताना’* नावाचे पुस्तक तयार झाले. आशेचा प्रकाश या पुस्तकात पालकांकडून मुलांच्या होणाऱ्या भावनिक शोषणाची गोष्ट आहे. हा विषय कधी चर्चिला जात नाही. ‘वयात येताना’ हे पुस्तक मुलांना वयात येण्याबाबतच्या गोष्टी रसाळपणे आणि माहितीपूर्ण पद्धतीने सांगते.

निसर्गासोबत किंवा एकमेकांसोबत दृढ नाते निर्माण होणे हा लहानपणीच्या अनुभवांमधला एक महत्त्वाचा भाग आहे. *‘तिलाच का? मला का नाही?’* या शबनम मिनवाला यांनी लिहिलेल्या आणि प्रिन्सी रावत यांनी चित्रांकन केलेल्या पुस्तकात असूया आणि मैत्री याबद्दलची गोष्ट आहे. *‘विसराळू आजी’* हिमांजली शंकर यांनी लिहिलेल्या आणि आदिती आनंद यांनी चित्रांकन केलेल्या पुस्तकात तीन पिढ्यांतील स्त्रिया एकत्र येतात. यांतल्या एकीला ‘अल्झायमर’ नावाचा आजार झालेला आहे.

कासवपाठी किडा या युआन एव्ज यांनी लिहिलेल्या आणि रेशू सिंग यांनी चित्रांकन केलेल्या पुस्तकात एका संवेदनशील मुलाची गोष्ट सांगितलेली आहे. या मुलाला निसर्गाच्या संगतीत स्वत:ची ओळख पटते. नासाकडून उपलब्ध झालेल्या अवकाश छायाचित्रांपासून प्रेरणा घेऊन अपर्णा कपूर आणि बिजल वच्छरजानी यांनी *'अंतराळातले नियम'* नावाचे पुस्तक लिहिले आहे. हे पुस्तक अवकाश भ्रमणासाठीच्या तात्त्विक गोष्टींचे हसतखेळत मार्गदर्शन करते. या पुस्तकासाठी कनातो जिमो यांनी चित्रे काढली आहेत.

'आपल्या भोवतालचा समुदाय आणि मैत्री' ही या वर्षी प्रसिद्ध झालेल्या काही लक्षणीय पुस्तकांची मध्यवर्ती संकल्पना होती. सौम्या राजेंद्रन यांनी लिहिलेल्या आणि पार्वती सुब्रमणिअन यांनी चित्रांकन केलेल्या *'खोडकर मैत्रिणी'* या पुस्तकात अशाच मैत्रीची गोष्ट आहे. या मैत्रीमध्ये व्यक्तीला स्वत:चे स्थान असते. *'स्वातंत्र्यकन्या'* या मेनका रामन यांनी लिहिलेल्या आणि कृत्तिका सुसरला यांनी चित्रांकन केलेल्या कथेत संगीताची आवड जोपासणाऱ्या *पयोष्णीची गोष्ट* विनोद आणि सौहार्द यांच्या मदतीने सांगितलेली आहे.

प्रथम बुक्सचा गेल्या २० वर्षातील पुस्तकांची पुस्तकसूची म्हणजे शब्द आणि चित्रांची अनोखी मेजवानी आहे. झपाट्याने बदलणाऱ्या जगाबरोबर चालताना आमच्या टीमला एक अभिनव कल्पना सुचली. प्रथम बुक्सने प्रकाशित केलेल्या काही जुन्या पुस्तकांसाठी नव्याने चित्रे काढून घ्यावीत, अशी ती कल्पना होती. यामुळे ती वाचकांसाठी अधिकच आकर्षक बनली आहेत. त्यातील काही पुढीलप्रमाणे –

हे माझे घर आणि माझे मित्र (लेखक- रुक्मिणी बॅनर्जी, चित्रे- बाबीकिकी); मी आणि माझी बहीण (लेखक- कांचन बॅनर्जी, चित्रे- काबिनी अमीन); माझी बॅट हरवली, माझी बॅट सापडली (लेखक- मीरा तेंडोलकर, चित्रे- पल्लवी सिन्हा) आणि पाऊस आला रे; (लेखक- संजीव जयस्वाल, चित्रे- तस्मिन अमीरुद्दीन). या वर्षीदेखील प्रथम बुक्स आणि सिंगापूर बुक कौन्सिलने एशियन फेस्टिव्हल ऑफ चिल्ड्रन्स कॉंटेंटचे (AFCC) यशस्वीरित्या आयोजन केले होते. यामधील इंटरनेटवरून घेण्यात आलेल्या हॅकेथॉनमध्ये भारत, नेपाळ, सिंगापूर, थायलंड, मलेशिया, ऑस्ट्रेलिया येथून स्पर्धकांचा सहभाग होता. यामध्ये पाच भाषांमधील (हिंदी, तमिळ, चिनी, व्हिएतनामी आणि मलय) सहा चित्रपुस्तकांवर आधारित पुस्तके निर्माण केली गेली. म्हणजे एकूण छत्तीस पुस्तके! यातले प्रत्येक पुस्तक म्हणजे कुतूहल, आश्चर्य आणि विविधता या गुणांचा जणू उत्सवच.

एएफसीसी सिंगापूर येथे आमच्या टीमने शब्दविरहित पुस्तकांवर शोधनिबंधदेखील सादर केले. आमच्या टीमला तिथे विविधता, द वर्ल्ड वुई लिव्ह इन या विषयांवर नॅशनल गॅलरी सिंगापूर आणि सिंगापूर आर्ट म्युझिअम येथे व्हर्च्युअल सादरीकरण करण्यासाठी निमंत्रण दिले गेले होते.

आमच्या टीमने ATREE आणि सृष्टी मणिपाल इन्स्टिट्यूट ऑफ आर्ट डिझाईन अँड टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांसमवेत चित्रपुस्तकांच्या विविध पैलूंवर चर्चा केली.

चरित्रात्मक पुस्तकांच्या महत्त्वाबद्दल आमचे संपादक शिनीबाली मित्रा सैगल आणि राधिका शेणॉय यांनी NISSEM यांच्यासाठी शोधनिबंध लिहून सादर केला.



फोटो १: नीव बुक अॅवार्ड विजेते सदाफ सिद्धीकी आणि हबीब अली यांच्यासोबत प्रथम बुक्स टीमचे सदस्य

फोटो २: ATREE, बंगळुरू येथे झालेल्या कार्यशाळेत प्रथम बुक्सची कॉंटेंट टीम

फोटो ३: एशियन फेस्टिव्हल ऑफ चिल्ड्रन्स कंटेंट २०२३ मधील संपादक स्मित झवेरी आणि आर्ट डिरेक्टर कॅनाटो जीमो यांचे स्केचबुक

फोटो ४: बुकरू बडोदामध्ये कला दिग्दर्शक आणि पुरस्कारप्राप्त चित्रकार कनातो जिमो

फोटो ५: ***'हरवलेली सुंदरी'*** साठी प्रिया कुरियन यांना बिनोद कनोरीया पुरस्कार मिळाला

फोटो ६: सृष्टी इन्स्टिट्यूट ऑफ आर्ट, डिझाईन अँड टेक्नोलॉजीमधील विद्यार्थ्यांसोबत चित्रपुस्तके बनवण्याबाबत कार्यशाळा

पुरस्कार

हरवलेली सुंदरी

मेहल्ली गोभाई चिल्ड्रन्स बुक – इलस्ट्रेटर ऑफ द इयर : प्रिया कुरियन

जेव्हा आम्ही घरी असतो

अट्टा गलाट्टा- बंगलोर लिटरेचर फेस्टिव्हल बेस्ट चिल्ड्रन्स पिक्चर बुक स्टोरी

आपलं सुंदर जग

पब्लिशिंग नेक्स्ट इंडस्ट्री ॲवार्ड्‌स २०२३ चिल्ड्रन्स बुक ऑफ द इयर ८+ विनर

पुरस्कार

सूर्य आला!

फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स अॅवॉर्ड्स फॉर एक्सेलन्स इन बुक प्रॉडक्शन, २०२३, चिल्ड्रन बुक्स (जनरल इंटरेस्ट) (०-१० वर्षे) (तमिळ) सेकंड प्राईज

छोट्याशा या गल्लीत

नीव बुक अॅवॉर्ड – अर्ली रीडर्स

करामती आजी

रूम टू रीड टीचर- लायब्ररिअन्स चॉईस अॅवॉर्ड्स रनर अप

पुरस्कार

गप्पू गोळा

रूम टू रीड – पिक्चर बुक ऑफ द इयर

अलंकृता अमया

रूम टू रीड – रनर अप यंग ऑथर ऑफ द इयर

लाल परी

रूम टू रीड टीचर- लायब्ररिअन्स चॉईस अॅवॉर्ड्स रनर अप

कहाणी, गोष्ट, किस्सा आणि बरेच काही...

एक बहुभाषिक प्रकाशन म्हणून प्रथम बुक्स बहुरंगी भारतीय भाषांमधून मुलांसाठी सर्वसमावेशक साहित्य निर्माण करण्यासाठी कटिबद्ध आहे. यावर्षी आम्ही आमच्या पुस्तकांच्या सूचीमध्ये नव्या भाषांची भर घातली आहे. आमच्या विविध भाषांमधील अनुवादांसाठी आर्थिक तरतूद करण्याचे आम्ही नवे मार्ग शोधले आहेत. अनेक भारतीय भाषांमध्ये मूळ पुस्तके (Language – First Books) निर्माण केली आहेत. त्याचप्रमाणे या मूळ भाषेतून अन्य भाषांत अनुवाद केले आहेत.

फायडेलिटी (Fidelity) प्रकल्पांतर्गत ११ भाषांमध्ये एकूण ५०० पुस्तके निर्माण केली आहेत. यांमध्ये काश्मीरी, नेपाळी, बोडो, आसामी, उर्दू आणि मणिपुरी भाषांचा समावेश आहे. यासाठी आमच्या टीमने अनुवादकांसोबत तांत्रिक आणि भाषिक भागांवर कल्पक ऑनलाईन चर्चा करून विविध भाषांतील अनुवादांची गुणवत्ता अधिक उंचावली आहे.

गोंडी ही भाषा भारतातील ७ राज्यांमध्ये स्थानिक भाषा म्हणून बोलली जाते. सुमारे २७ लाख लोक ही भाषा बोलतात. गोंडी भाषेतील चित्रपुस्तकांनी ती भाषा बोलणाऱ्या मुलांना वाचनाचा आनंद मिळवून दिला आहे. वर्गात ज्या भाषा बोलल्या जातात तिथवरचा प्रवास सोपा केला आहे. आम्ही १०० गोंडी पुस्तके तयार करण्यासाठी शिक्षार्थ ट्रस्ट समवेत काम केले. ही पुस्तके सुकमा या छत्तीसगडमधील संघर्षमय भागातील मुलांपर्यंत पोहोचली आहेत.

ईशान्येकडील राज्यांसाठी चित्रपुस्तके बनवण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. या अंतर्गत आम्ही २० पुस्तकांची निर्मिती केली जी बहुतांशी ईशान्येकडील लेखक आणि चित्रकारांनी निर्माण केलेली होती. ती आसामी

५८०+
पुस्तके

११+
भाषांमध्ये अनुवाद

४+
प्रादेशिक भाषांमध्ये लिहिलेल्या पुस्तकांची निर्मिती

भाषेत अनुवादित झाली. आसामी अनुवादासाठी HTPF कडून आर्थिक साहाय्य मिळाले होते आणि राष्ट्रीय अनुवाद मिशनच्या (National Translation Mission) सहयोगाने ही निर्मिती केली गेली.

पाच स्टोरीकाड्‌र्स अका ऱ्हुसो (Aka Hrusso) आणि सिंगफो (Singpho) या नष्ट होत चाललेल्या भाषांमध्ये अनुवादित झाली आहेत. याच्या अनुवादाचे आणि तपासणीचे काम सिंगफो समुदायातील सदस्यांनीच केले. नबानिता देशमुख यांनी या प्रकल्पाचे समन्वयक म्हणून काम पाहिले.

अधिकाधिक पुस्तके अनुवादित करण्याच्या आमच्या प्रयत्नाचा भाग म्हणून आम्ही पहिल्यांदाच ईशान्येकडील भाषांमध्ये पुस्तके अनुवादित करण्यासाठी क्राऊड फंडिंग मोहीम राबवली होती. याअंतर्गत *‘वयात येताना’* हे वयात येणाऱ्या मुलांना आपल्या शरीराविषयी पडणाऱ्या प्रश्नांबद्दलचे पुस्तक आणि *‘साडी नेसला बाबा’* हे घराघरांतील लिंगभावाबद्दल गमतीशीर भाष्य करणारे पुस्तक अनुवादित झाले.

मातृभाषेतून वाचन करण्याचा जेव्हा मुलांना आनंद मिळतो, तेव्हा ती पुस्तकांसमवेत चांगले नाते जोडतात. आपली वाचन आणि आकलन कौशल्ये ती विकसित करतात. त्यामुळे त्यांची वर्गातील कामगिरीदेखील सुधारते. एका भारतीय भाषेतून थेट दुसऱ्या भाषेत अनुवाद होणे ही भारतामध्ये बालसाहित्यात तशी दुर्मीळ गोष्ट आहे. त्यामुळे आम्ही यावर्षी हे आव्हान स्वीकारायचे ठरवले. एका भारतीय भाषेतून थेट दुसऱ्या भारतीय भाषेत अनुवाद झाल्याने, मूळ आशय जसाच्या तसा पोहोचवायला मदत झाली. यावर्षी मूळ हिंदी पुस्तके थेट मराठी, कन्नड आणि तमिळ भाषेत अनुवादित झाली.

आम्ही ज्येष्ठ अनुवादक आणि साहित्य अकादमी विजेत्या लेखकांची भाषाविषयक पुस्तकांसाठी मदत घेतली. *‘एक होती इडली’* हे जयंत कायकिणींनी मराठीमधून कन्नड भाषेमध्ये अनुवादित केलेले पुस्तक हे याचेच उदाहरण होय.

सातत्याने उच्च दर्जाची मूळ आणि अनुवादित पुस्तके निर्माण करण्यासाठी प्रमाणीकरण आणि पुस्तकनिर्मितीच्या बाबतीतील उत्तम कार्यपद्धती समजावून घेणे खूप महत्त्वाचे आहे. तेलुगु अनुवादकांसाठी मंचीपुस्तकम् आणि मोहन पाटीपका, नॅशनल बुक ट्रस्ट यांच्या सहयोगाने ऑनलाईन सत्रे आयोजित केली गेली. त्यातून तेलुगू भाषेत अनुवादासाठी सर्वोत्तम पद्धतींवर आधारित एक स्टाईलशीट तयार केली गेली.

आमच्या मूळ हिंदी भाषेतील पुस्तकांनी अनेक पारितोषिके प्राप्त केली आहेत. अलंकृता अमाया यांना ‘रंगीत रंगीत पुस्तक’ या पुस्तकासाठी रूम टू रीडतर्फे सर्वोत्कृष्ट लेखकाचे पारितोषिक मिळाले. विष्णु एम. नायर यांना ‘गप्पू गोळा’ या पुस्तकासाठी रूम टू रीडतर्फे सर्वोत्कृष्ट चित्रकारितेसाठी पारितोषिक मिळाले. ‘करामती आजी’ या पुस्तकाला लायब्रेरिअन्स चॉईस हा पुरस्कार रूम टू रीडतर्फे मिळाला.

आम्ही अनेक राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय व्यासपीठांवर सहभागी झालो होतो. यामध्ये एनसीईआरटीने आयोजित केलेल्या ‘डेव्हलपिंग गाईडलाईन्स फॉर नॅशनल बुक प्रमोशन’ या विषयावरील कार्यशाळेचा समावेश आहे. त्याचप्रमाणे भाषा फाऊंडेशनने पुण्यात आयोजित केलेल्या लिटरेचर फेस्टिव्हलचा समावेश आहे. तसेच ख्राईस्ट युनिव्हर्सिटी आणि CIIL यांनी आयोजित केलेल्या नॅशनल ट्रान्सलेशन सिंपोजियम यामध्ये आम्ही सहभाग घेतला. कन्नडा भाषेतील दैनिक ‘विजया कर्नाटका’ यांनी आयोजित केलेल्या कन्नडा भाषेतील लहान पुस्तकांच्या पॅनल डिस्कशनमध्येदेखील आम्ही सहभागी झालो.

प्रथम बुक्सची पुस्तके आमच्या शाळेतल्या मुलांना खूपच आवडली. या पुस्तकांनी आमचा वाचनाचा तास अतिशय रंजक केला आहे. मराठी चित्रपुस्तकांचे हे जग आमच्या शाळेतल्या मुलांना खूपच नवीन आहे. वेगवेगळ्या वाचन पातळ्यांवर आधारित असणारी पुस्तकं मुले स्वतः निवडतात व वाचतात. पुस्तकांतील गोष्टी आणि त्यातील भाषा मुलांना सोपी वाटली.”

गीतारानी

प्राथमिक शाळा शिक्षिका

फोटो १: चिरंतन रंग अध्ययन केंद्राच्या संस्थापक किरण भट यांनी कर्नाटकमधील उत्तर कन्नड जिल्ह्यातील सिरसीच्या दुर्गम गावांमध्ये गाण्यांसह एक संवादात्मक वाचन सत्र आयोजित केले होते.

फोटो २: मुलांनी पहिल्यांदाच एक चित्रकथांचे पुस्तक पाहिले! त्यांनी निवडलेली पुस्तके वाचून त्यावर चित्र काढली आणि ती घरी घेऊन जाताना त्यांना आनंददेखील झाला.

फोटो ३: प्रथम बुक्सच्या अनुवादक वाणी पीरियोडी यांनी कर्नाटकमधील काप्पल जिल्ह्यातील समर कॅम्पमध्ये "मुखवटा" ही गोष्ट वाचली. मुलांनी गोष्ट आनंदाने ऐकली आणि नंतर स्वत: मुखवटे बनवले.

फोटो ४: दिल्लीतील सर्वोदय कन्या विद्यालयाच्या इयत्ता तिसरीच्या मुलांनी आमच्या हँगिंग लायब्ररी किटमधील पुस्तके आवडीने पाहिली.

प्रत्येक मुलासाठी गोष्ट

२ कोटी
वेळा ऑनलाईन वाचन

३६१
भाषा

६०,३००
गोष्टी

डॉ. रुडीन सिम्स् बिशप यांनी असे म्हटले आहे की, “पुस्तके एखाद्या खिडकीप्रमाणे असतात. ती खऱ्या अथवा कल्पित, ज्ञात तसेच अज्ञात जगाचे दृश्य दाखवतात. या खिडक्या म्हणजे काचेची सरकती दारेसुद्धा असतात. लेखकाने निर्माण केलेल्या जगात वाचकाला केवळ कल्पनेतूनच चालत जायचे असते. त्या जगाचा भाग व्हायचे असते.” म्हणूनच आम्ही ज्यांमुळे वाचनाचा आनंद द्विगुणित होईल, साक्षरतेचा पाया पक्का होईल आणि विद्यार्थ्यांच्या मनामध्ये STEM भारतीय भाषांमधून (हिंदी, मराठी, उर्दू, ओरिया आणि इतर अनेक) रुजेल असे कथाविषयक उपक्रम निर्माण केले आहेत. आम्ही जवळपास १५ हजार शिक्षकांना गोष्टींच्या माध्यमातून अभ्यासक्रम शिकवण्याचे प्रशिक्षण दिले आहे आणि त्याचा शिक्षणाच्या गुणवत्तेत मोठाच परिणाम वारंवार दिसून आला आहे. या वर्षी कोटा, राजस्थान येथील ३० शाळांमध्ये आम्ही प्रायोगिक तत्त्वावर STEM साक्षरता उपक्रम राबवला होता. ज्यामध्ये विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता तपासणीत ४२ टक्क्यांपासून ७५ टक्क्यांपर्यंत म्हणजेच ३३ टक्क्यांनी वाढ दिसून आली आहे.

हे उपक्रम शिक्षण विभागाच्या सहकार्याने राबवले गेले. ज्याला शिक्षक आणि पालक या दोहोंकडून उत्तम प्रतिसाद लाभला. दहिवडी, तुळजापूर येथील जिल्हा परिषद शाळेच्या सविता साठे यांनी पायाभूत साक्षरता उपक्रमाच्या अंमलबजावणीनंतर असे नमूद केले की, “माझ्या वर्गात काहीशी मागे पडणारी मुलेदेखील गोष्टीच्या पुस्तकांचा आनंद घेत आहेत आणि आवडीने पुस्तक मागून घेत आहेत.” मागील वर्षी युनिसेफ आणि एनसीईआरटी यांच्या सहकार्याने आम्ही हा उपक्रम उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान आणि गोवा येथे ४ लाख ५० हजार मुलांसाठी राबवला आणि त्यांच्यासाठी वाचनातून शिक्षणाच्या आनंदाचे दालन खुले केले गेले.

मातृभाषेतून वाचनाचा आनंद मिळवण्यासाठी एकमेकांच्या सोबतीने काम करणे आवश्यक आहे. स्टोरीविव्हरने आजपर्यंत अनेक लेखक, चित्रकार, अनुवादक, शिक्षक आणि पालकांसोबत काम केले

आहे. वाचनाच्या आनंदाला खतपाणी घातले आहे आणि अनेक अर्थांनी वाचनाची देशव्यापी चळवळच उभारली आहे.

जागतिक स्टोरीटेलिंग दिवस (मार्च २०, २०२३) रोजी आम्ही #GetChildrenReading या उपक्रमाची सुरुवात केली आणि पालकांना आठवड्यातून एकदा तरी मुलांना गोष्टीचे पुस्तक वाचून दाखवण्यासाठी प्रोत्साहित केले. या उपक्रमामध्ये ज्यामुळे स्थानिक समुदायासाठी वाचन जास्त रंजक आणि उपयुक्त ठरेल, अशी काही खास पुस्तके आणि इतर स्रोत उपलब्ध करून दिले होते. यातील हजारो सहभागींनी दर आठवड्याला वाचनसत्रे घेतली ज्यामध्ये आजूबाजूच्या सर्वांना सामील करून घेण्यासाठी विविध साधने, युक्त्या वापरल्या गेल्या. उदाहरणार्थ – श्रवण सदोष मुलांसाठी अमेरिकन साईन लँग्वेजमधील दृकचित्र साधने (ए.व्ही. रिसोर्सेस) वापरली गेली. अर्चना अत्रे (AA Book Nerds च्या संस्थापिका) या मुलांसाठी बुकक्लबमधून वाचन करतात, शब्दांना जिवंत करतात. त्या असे म्हणतात की, "प्रथम बुक्सच्या 'गेट चिल्ड्रन रीडींग' उपक्रमाचे यश यातच सामावलेले आहे. मुलांना वाचून दाखवा, मुलांसोबत वाचा. त्यांना वाचनाच्या आनंदाप्रत घेऊन जा आणि मग पुस्तकांच्या जगात मुक्तविहार करण्यासाठी त्यांना मोकळे सोडा."

स्टोरीविव्हरमध्ये आम्ही नेहमीच सर्व समुदायांसाठी आपापल्या भाषांमध्ये पुस्तके निर्माण करायला हवीत असे मानत आलो आहोत. याच हेतूने आम्ही सौरमंडल सोबत द फरगॉटन फोकलोर (The Forgotton Folklore) हा उपक्रम राबवला. यामध्ये मेघालयातील स्थानिक लोककथांची माहिती ४५ उत्फुल्ल चित्रपुस्तकांमधून प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. हे काही केवळ एक सर्वसाधारण पद्धतीचे प्रकाशन नव्हते. हा पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या कथांना एकत्र करणारा समुदायाने मिळून केलेला प्रयत्न होता. खासी, गारो आणि नार (Pnar) या भाषांमधील कथांमध्ये स्थानिक कथांचा पट उलगडला. द गारमेंट सिरीज या मालिकेत परंपरागत वस्त्रांची माहिती दिली गेली आहे. यातील प्रत्येक पान हे मेघालयातील हस्तकलेची सुंदरता उलगडून दाखवणारे आहे. बान्स जर्नी इन म्युझिक या Hynniewta यांनी लिहिलेल्या आणि अर्बन मॉऊथोह यांनी चित्रांकन केलेल्या कथेत एका लहान मुलाची गोष्ट आहे. या मुलाला वाखेन नावाच्या गावात आपल्या संगीताचा सूर सापडतो. हे पुस्तक लहान मुले आणि मोठी माणसे सर्वांच्याच पसंतीस उतरले आहे. येथील पक्षीवैविध्याविषयीची द्वैभाषिक पुस्तके निसर्ग आणि कथानक यांची सांगड घालणारी आहेत. यांमध्ये या पर्वतीय राज्याचे मेघाच्छादित सौंदर्य शब्दांनी जतन केलेले आहे. ही पुस्तके स्थानिकांनीच प्रथमतः लिहिलेली आणि चित्रीत केलेली आहेत. सौरमंडलने त्यावर पुढील संस्करण केलेले आहे. 'कधीकधी अत्यंत महत्त्वाचा सामाजिक बदल मोठ्या घटनांमधून न होता केवळ आपली स्वतःची गोष्ट सांगण्यातूनही होऊ शकतो' हे द फरगॉटन फोकलोर प्रकल्पाने हे सिद्ध केले आहे.

ही होती आमच्या डिजिटल प्लॅटफॉर्मची या वर्षीची कामगिरी. आम्ही आशयनिर्मिती, अनुवाद, प्रसार यासाठी अनेकांसोबत काम केले आणि वाचनाच्या आनंदाचा प्रसार केला आहे, ज्यायोगे प्रत्येक मुलाला आपल्या मातृभाषेतील पुस्तक हातात घेऊन वाचण्याचा आनंद मिळू शकेल.





फोटो १: उर्दूमधील #GetChildrenReading मोहिमेत सहभागी झालेली मुले

फोटो २: सौरमंडलच्या फरगॉटन फोकलोर (The Forgotton Folklore) प्रोजेक्टच्या गोष्टी, स्टोरीविव्हरवर प्रकाशित

फोटो ३: कोटामध्ये लागू करण्यात आलेला STEM साक्षरता कार्यक्रम

फोटो ४: कोटामध्ये STEM साक्षरता कार्यक्रमाच्या प्रशिक्षणात सहभागी झालेले शिक्षक



शब्दांची ताकद

PRATHAM BOOKS
donate-a-book

२.१

लाख मुलांसाठी

४१,०००

पुस्तके आणि स्टोरी कार्ड्सचे वाटप

८००+

देणगीदार सहभागी

आमच्या क्राउडफंडिंग प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून व्यक्ती, स्वयंसेवी संस्था (NGOs), ग्रंथालये आणि संघटनांना जोडण्याची आणि मुलांना गोष्टीची पुस्तके पुरवण्यासाठीची आमच्या टीमची मेहनत यावर्षी विलक्षण यशस्वी ठरली आहे. विविध भाषांमधील आमची पुस्तके भारतभरातील दुर्गम आणि सेवासुविधांपासून वंचित भागातील मुलांपर्यंत पोहोचली. प्रत्येक वाचकापर्यंत पोहोचलेल्या पुस्तकासोबत, जादू आणि आनंदाने भरलेले एक नवे जग उघडले गेले आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे आम्ही हे अनेकवेळा करू शकलो.

बर्फाच्छादित पर्वतांनी वेढलेल्या, नदीच्या सान्निध्यात वसलेल्या झांबूर पट्टण, उरी (जम्मू काश्मीर) या सीमावर्ती गावातील एका प्राथमिक शाळेला व तिच्या आसपासच्या शाळांना पहिल्यांदाच गोष्टींच्या पुस्तकांचे ग्रंथालय मिळाले. मुलांना त्यांच्या मातृभाषेत, उर्दूमध्ये, पहिल्यांदा गोष्टींची पुस्तके हाताळण्याचा आणि वाचण्याचा आनंद मिळवता आला.

“एक चांगले शैक्षणिक पर्यावरण निर्माण करण्यासाठी प्रत्येकाची भूमिका महत्त्वाची आहे, मुले आपले भविष्य आहेत. त्यांच्यासाठी प्रथम बुक्सने आपले जे योगदान दिले आहे ते पाहणे कौतुकास्पद आणि हृदयस्पर्शी आहे. त्यांनी तयार केलेली विविध भाषांमधली बालककेंद्री पुस्तके प्रशंसनीय आहेत. इब्तिदासारखे उपक्रम देशाला एकत्र आणतात आणि मुलांसाठी एक चांगला समाज घडवतात.”

असे १६ व्या बटालियन राजपुताना रायफल्सचे मेजर अभिलाष म्हणाले

युकॅटॅपल्ट फाउंडेशनचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक प्रेम मिश्रा यांनी महाराष्ट्रात जळगाव जिल्ह्यातील धरणगाव येथे ग्रामीण भागात STEM साक्षरता पुस्तकांच्या प्रसारासाठी निधी गोळा केला होता. या पुस्तकांचा विद्यमान अभ्यासक्रमात विचारपूर्वक समावेश करण्यात आला. यामुळे STEM मधील संकल्पना विद्यार्थ्यांसाठी अधिक सुलभ आणि हव्याहव्याशा बनल्या. शिवाय मुख्याध्यापकांसाठीच्या प्रशिक्षण सत्रांमध्येदेखीलया पुस्तकांचा उपयोग करण्यात आला. त्यामुळे STEM शिक्षणाचे महत्त्व अधिकच ठळक झाले.

डोनीपोलो सांस्कृतिक व धर्मादाय ट्रस्टच्या मदतीने अरुणाचल प्रदेशातील पुल्यी गावातील **न्युबू न्युगाम येरको शाळेतील** मुलांपर्यंत आमची गोष्टीची पुस्तके पोहोचली. या ट्रस्टने स्थानिक आदिवासी समुदायांच्या परंपरांचे जतन व संवर्धन करण्यासाठी २०२२ मध्ये ही शाळा निसी जमातीतील विद्यार्थ्यांसाठी स्थापन केली होती.

मणिपूरमधील अस्थिरतेमुळे मोठ्या प्रमाणावर मुलांना शाळा सोडून मदतकेंद्रामध्ये जावे लागले. तिथे त्यांना कोणतीही पुस्तके उपलब्ध नव्हती. अशा परिस्थितीत सेंटर फॉर कम्युनिटी इनिशिएटिव्ह (CCI) ने लामका, मणिपूर आणि विविध केंद्रांमध्ये विस्थापित मुलांसाठी एक समावेशक सामुदायिक शिक्षण केंद्र (iCLC) स्थापन केले आहे. कठीण काळात मुलांना आधार देण्यासाठी आणि त्यांना साहित्य व पुस्तकांशी संबंधित उपक्रमांद्वारे विरंगुळा पुरवण्यासाठी प्रथम बुक्सची आनंददायी गोष्टींची पुस्तके वापरण्यात येत आहेत.

फोटो १: अरुणाचल प्रदेशातील मव्या येथील न्युबू न्व्गम येरको येथील मुलांसाठी पुस्तके.

फोटो २: मणिपूरमधील लामका येथील विस्थापित मुलांना पुस्तकांद्वारे प्रशिक्षित करणे.

फोटो ३ आणि *४:* काश्मीर खोऱ्यातील पहिली लायब्ररी जम्मू आणि काश्मीरमधील उरी, झांबूर पट्टन येथे स्थापन केली.

फोटो ५: जळगाव जिल्ह्यातील धरणगावातील ग्रामीण मुलांसाठी STEM पुस्तके.

गोष्टींना पंख देताना

१५ लाख

पुस्तकांचे वितरण

५० लाखांहून

अधिक मुलांपर्यंत पुस्तके पोहोचली.

२८००

वर्ग ग्रंथालये निर्माण केली

२७

राज्ये आणि ६ केंद्रशासित प्रदेशात पुस्तके पोहोचली

२४५

हून अधिक संस्थांबरोबर सहयोग

पुस्तके उपलब्ध असणे हे प्रथम बुक्सचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. आमच्या टीमने अनेक प्रदेशांमध्ये आणि अनेक भाषांमध्ये लहान मुलांच्या हाती पुस्तक जाईल, यासाठी काम केले आहे. नवनवीन ठिकाणी आमची पुस्तके पोहोचवण्यामध्ये आम्ही चांगली प्रगती केली आहे. अनेक विद्यार्थी आणि शिक्षकांच्या जीवनाशी आम्ही जोडले गेलो आहोत. यातील एक ठळक यश म्हणजे आम्ही ज्या भाषांमध्ये आधी काम केलेले नव्हते, त्या भाषांमध्ये आता आम्ही पुस्तके आणि स्टोरीकार्ड्सची निर्मिती करतो आहोत. यांतल्या काही भाषांचे अस्तित्त्व आजच्या घडीला धोक्यात आहे आणि त्या भाषा बोलणाऱ्या माणसांची संख्या झपाट्याने कमी होते आहे.

या प्रकल्पांतर्गत आका ऱ्हुसो आणि सिंगफो या नष्ट होत चाललेल्या भाषांमध्ये ३,५०० स्टोरीकार्ड्स छापली गेली आणि वितरित केली गेली. अरुणाचल प्रदेश येथे आका ऱ्हुसो भाषा बोलणारे केवळ ४,००० भाषक उरले आहेत. तसेच आसाममध्ये सिंगफो भाषा बोलणारे केवळ ३,००० भाषक शिल्लक आहेत.

छत्तीसगडमधील सुकमा जिल्ह्यात सरकारी शाळांसमवेत काम करणाऱ्या शिक्षार्थ ट्रस्टसाठी गोंडी भाषेमध्ये प्रथमच ९२ गोष्टी उपलब्ध झाल्या. गोंडी भाषेतील २६६ लायब्ररी इन अ क्लासरूम संचदेखील वितरित करण्यात आले.

आमच्या विसाव्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने “जॉय इन ए बॉक्स” हे आमचे नवीन उत्पादन आम्ही उपलब्ध करून दिले आहे. आम्ही इंग्रजी, हिंदी, मराठी आणि कन्नड भाषांमध्ये बॉक्समध्ये वितरित केले जाणारे १६०० संच छापले.

इंग्रजी, हिंदी, गुजराथी, मराठी, कन्नड आणि तेलुगु या भाषांमध्ये “अर्ली लर्नर्स लायब्ररी” समवेत ६० वाचन साधने वितरित करण्यात आली. देशभरात आमची पुस्तके आणि अन्य शैक्षणिक साधने अनेकांच्या सहयोगाने मुलांपर्यंत पोहोचली.

कारितास इंडिया (Caritas India) समवेत खुशाल बचपन या कार्यक्रमाच्या अंतर्गत मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगडच्या दूरवरच्या प्रदेशात पोहोचला.

या प्रकल्पामध्ये आम्ही ४,१७३ मुलांपर्यंत पोहोचू शकलो आणि त्यांच्या ८५ शैक्षणिक मार्गदर्शक व्यक्तींचा क्षमताविकासदेखील यातून साध्य झाला. त्यांनी आमची पुस्तके शिकवण्यासाठी आणि आपले ज्ञान वाढवण्यासाठी वापरली, हे यामागचे एक प्रमुख कारण आहे.

‘बाल चौपाल’साठी प्रथम बुक्सच्या हँगिंग लायब्ररीज् हा एक मुलांसाठीचा अनमोल ठेवा होता. यांसाठी ५२ लायब्ररी इन ए क्लासरूम संच वितरीत करण्यात आले.

इथे समुदायाबरोबर काम करणारी एक शिक्षिका म्हणते :

“जेव्हा मी मुलांना ग्रंथालयाची ओळख करून दिली, तेव्हा गोष्टींची पुस्तके वाचण्यासाठीचा त्यांचा अधीर उत्साह मी अनुभवला. या पुस्तकांमुळे प्रत्येकाला मोठ्याने वाचन करण्याची संधी मिळाली. जवळपास प्रत्येकानेच त्यात मनापासून सहभाग घेतला. त्यांना एकमेकांच्या गोष्टी उत्साहाने आणि अभिमानाने ऐकल्या. असा अनुभव त्यांना आधी कधीच मिळालेला नव्हता.”

गोष्टी सांगणे हा नवसहयोग फाउंडेशनच्या मुख्य कार्यक्रमाचा भाग आहे. दर शनिवारी या प्रकल्पांतर्गत एक तासाची सत्रे आयोजित केली जातात. प्रत्येक गावासाठी एक समन्वयक नेमला जातो. तो ही सत्रे आयोजित करतो. ग्राम समन्वयक प्रथम बुक्सच्या विविध स्तरांसाठी लिहिलेल्या पुस्तकांचा उपयोग करून मुलांना गोष्टी सांगतो. सध्या नवसहयोग फाउंडेशन कर्नाटक, तमिळनाडू आणि नागालँडमधील ३०० गावांमध्ये कार्यरत आहे आणि दररोज ९ हजारांहून अधिक मुलांसोबत काम करत आहे.

थिंकशार्प फाउंडेशनच्या बुक मित्र कार्यक्रमांतर्गत शाळांमध्ये ग्रंथालये स्थापन करण्यात आली आहेत. प्रत्येक ग्रंथालयामध्ये मराठी आणि इंग्रजी भाषेतील प्रथम बुक्सच्या पुस्तक मालिकांमधील विविध विषय आणि शैलींच्या गोष्टींच्या पुस्तकांचा समावेश आहे. बुक मित्र कार्यक्रमासाठी ३६,००० पुस्तकांचा उपयोग करण्यात आला आहे.

इंडी व्हिलेज फाउंडेशनने “स्टोरीटेलिंग शनिवार” कार्यक्रम सुरू केला आहे, ज्यामध्ये गोष्टी सांगण्यातून मूलभूत शिक्षणात असलेल्या प्रश्नांवर काम केले जाते. त्यांनी “लायब्ररी इन अ क्लासरूम” संचांचा वापर करून ३५ लहान लहान ग्रंथालये स्थापन केली आहेत. त्यांमुळे ६२१८ मुलांवर सकारात्मक प्रभाव पडला आहे.

इंडी व्हिलेज फाउंडेशनच्या टीमने म्हटले आहे,

“आमच्या सहयोगी शाळांमध्ये लायब्ररी डे साजरा केला गेला, तेव्हा मुलांच्या डोळ्यांत चमक दिसत होती आणि त्यांना गोष्टींची पुस्तके मिळाल्यावरचा आनंद खरोखर प्रेरणादायी होता. आमच्या प्रयत्नांमुळे समाजावर किती अर्थपूर्ण प्रभाव पडतो आहे, हे या क्षणांमुळे आम्हाला कळले. प्रथम बुक्सबरोबरचा सहयोग आम्ही खूप महत्त्वाचा मानतो आणि ग्रामीण भारतातील तरुण विद्यार्थ्यांना सक्षम बनवण्याच्या या सामूहिक मिशनला पुढे नेण्याची इच्छा व्यक्त करतो.”

सीआयएनआय ओडिशाने ओडिशाच्या रायगड जिल्ह्यातील सरकारी शाळा आणि अंगणवाड्यांमध्ये ग्रंथालये स्थापन केली आहेत. सीआयएनआयच्या सहयोगाने ओडिया आणि कुयी भाषेत ३४,०००+ पुस्तकांचे वितरण करण्यात आले असून, यामुळे ५७,००० मुलांवर सकारात्मक प्रभाव पडला आहे. कुयी ही एक आदिवासी भाषा असून या भाषेत लहान मुलांसाठी फारसे साहित्य उपलब्ध नाहीत. म्हणून, या पुस्तकांचा उपयोग हा मुलांच्या वाचन प्रवासात एक मोठा टप्पा ठरला आहे.

प्रथम एज्युकेशन फाउंडेशन, छत्तीसगडने छत्तीसगड जिल्ह्यातील ४ तालुक्यांमधील ४३० गावांमध्ये हँगिंग लायब्ररी स्थापन केल्या असून, यामुळे १०,००० मुलांना मदत झाली आहे.

टाटा ट्रस्टच्या सहयोगी संस्थेमधील सेंटर फॉर मायक्रोफायनान्स (सीएमएफ), राजस्थान, भारत, ही एक ना नफा संस्था आहे. आपल्या Access to Library Resources या कार्यक्रमाद्वारे, मुलांना अधिकाधिक गोष्टींच्या पुस्तकांचा आनंद मिळाला आहे. या प्रकल्पाअंतर्गत मुलांना गोष्टी, विविध वाचनसाहित्य आणि ग्रंथालय उपक्रमांचा लाभ मिळाला. प्रथम बुक्सच्या साहाय्याने या उपक्रमांतर्गत २३,००० पुस्तकांचा उपयोग करण्यात आला आहे.

“आम्ही आमच्या एका वर्गखोलीचे रूपांतर ग्रंथालयामध्ये केले आहे, आणि प्रत्येक वर्गातील मुले आळीपाळीने एक संपूर्ण दिवस ग्रंथालयामध्ये घालवतात. शिवाय दर सकाळी असेंब्लीदरम्यान मी दोन

गोष्टी सांगते. मुलांना दररोज सकाळी गोष्टी ऐकायच्याच असतात. आमच्या मुख्याध्यापिका श्रीमती अर्चना सिंह यांच्या पाठिंब्यामुळे हे शक्य झाले आहे.”

निगार खानुम, ग्रंथालय शिक्षक, शासकीय उच्च माध्यमिक विद्यालय कर्मोडा, सवाई माधोपूर.

काही प्रमुख संस्थात्मक ग्राहक रूम टू रिड इंडिया ट्रस्ट, प्रथम एज्युकेशन फाउंडेशन, अझीम प्रेमजी फाउंडेशन फॉर डेव्हलपमेंट, डी-मार्ट फाउंडेशन, इंडिया लिटरसी प्रोग्रॅम, एचसीएल फाउंडेशन, युनायटेड वे, नव सहयोग फाउंडेशन, थिंकशार्प फाउंडेशन, सीएलएनएल, भारती फाउंडेशन, बुक्स फॉर ऑल ट्रस्ट, सेंटर फॉर मायक्रोफायनान्स, लर्निंग लिंक्स फाउंडेशन, ॲस्पिअर, कोटर एज्युकेशन फाउंडेशन, रमण कांत मुंजल फाउंडेशन, अध्ययन क्वालिटी एज्युकेशन फाउंडेशन, द जेसीबी लिटरेचर फाउंडेशन, लीडरशीप फॉर स्किल एज्युकेशन फाउंडेशन यांसारख्या संस्था या यादीत सामील होत्या.

प्रमुख शासकीय ग्राहक झारखंड शिक्षण परियोजना, गुमला (झारखंड); इंटिग्रेटेड ट्रायबल डेव्हलपमेंट एजन्सी, ट्रायबल वेल्फेअर डिपार्टमेंट, जिल्हा उटनूर, तेलंगणा; समग्र शिक्षा, दादरा व नगर हवेली आणि दमण व दीव.

प्रमुख विक्रेते किंगमोअर, माइंडवर्थ समृद्धी एन्टरप्राइजेस, लोकायत प्रकाशन, लाइटरूम बुकस्टोअर, हिमांसू बुक डेपो, फंकी रेनबो, क्रिएटिव्ह लर्निंग एड्स, ज्ञानजागर, नंदा एन्टरप्राइजेस, अट्टा गुलट्टा बुकवर्म लायब्ररी, युरेका बुक्स, कहानी ट्री, ट्रिलॉजी इत्यादी.

काही प्रमुख शाळा अमिटी इंटरनॅशनल स्कूल, दिल्ली पब्लिक स्कूल, द हेरिटेज स्कूल, एअरफोर्स स्कूल, सनबीम लहरतारा, मदर्स प्राइड, सेठ एम. एआर. जयपुरिया स्कूल, अमृता विद्यालम, गुरुकुल स्कूल, इत्यादी.

फोटो १ आणि *२:* राजस्थानमध्ये कॅरिटास इंडियाद्वारे आयोजित गट वाचन आणि पालकांसोबत कथेचे वाचन.

फोटो ३: लायब्ररीच्या तासात पुस्तकांच्या जगात बुडून जाण्यासाठी उत्सुक विद्यार्थी

फोटो ४: ASPIRE द्वारा आयोजित समुदाय लायब्ररी वाचन कार्यक्रमात एक विद्यार्थी गोष्टी सत्राचे नेतृत्व करताना

फोटो ५: रायचूर, कर्नाटका आणि येमिगानूर, आंध्र प्रदेशमध्ये इंडी व्हिलेज फाउंडेशनद्वारे आयोजित वाचन सत्रांचा आनंद घेत असताना मुले.

घडवणे

५०

सहयोगींसोबत पुस्तकांची निर्मिती

२५००

स्टेम ग्रंथालयांची महाराष्ट्रात स्थापना

१२००

शाळा : 'गोवा वाचतो आहे' कार्यक्रमाची यशस्वी सांगता

२००

ग्रंथालये आदिवासी भाषांसाठी

आमच्या देणगीदारांच्या सातत्यपूर्ण सहकार्याने आम्हाला पुस्तके तयार करण्यास आणि वितरित करण्यास मोठीच मदत झाली. त्यांच्याकडून मिळालेल्या देणग्यांच्या जोरावर आम्ही भारतातील सर्वोत्कृष्ट लेखक-चित्रकारांच्या सहकार्याने अधिक आनंददायी गोष्टींची पुस्तके तयार करू शकलो. तसेच मोठ्या प्रमाणात भाषांतर प्रकल्प हाती घेऊ शकलो आणि आमची पुस्तके देशभरातील अधिकाधिक मुलांपर्यंत पोहोचवू शकलो. आजचा वाचक हा उद्याचा जबाबदार आणि विचारशील नागरिक असेल, या संकल्पनेला जागून आम्ही विविध प्रकारची पुस्तके जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोहोचवली. यासाठी आम्हाला लाभलेले आर्थिक पाठबळ मोलाचे ठरले.

कॅटरपिलर संस्थेच्या मदतीने मुंबईतील महापालिकेच्या शाळांमध्ये आणि छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हा परिषद शाळांमध्ये २५०० हून अधिक STEM ग्रंथालये स्थापन करण्यात आली. या उपक्रमाचा ३,००,००० हून अधिक मुलांना उपयोग झाला. हा यावर्षीचा सर्वांत मोठा अनुदान उपक्रम होता.

यूएसटी ग्लोबल वेल्फेअर फाउंडेशनने कोइंबतूरच्या करमडाई भागातील शासकीय शाळांमध्ये १०० ग्रंथालये स्थापन केली, ज्यांमुळे गुणवत्तापूर्ण शैक्षणिक साधने अधिक प्रमाणात उपलब्ध झाली.

बंगलोरमधील शॉपिफाय कॉमर्स इंडियाने अनेकल तालुक्याच्या ग्रामीण भागातील शासकीय शाळांमध्ये १८५ ग्रंथालये प्रायोजित केली.

क्लाऊडेरा डेटा प्लॅटफॉर्म, इंडिया यांच्या सहकार्याने बंगलोरमधील शासकीय शाळांमध्ये ९३ ग्रंथालये उभारली गेली.

एच.टी. पारेख फाउंडेशनने त्यांच्या दुर्बीण उपक्रमाद्वारे आसाम, छत्तीसगड आणि गुजरातमधील मुलांच्या पुस्तकांचे भाषांतर, निर्मिती आणि वितरण यासाठी मदत दिली. यामुळे आमच्या मातृभाषेतील पुस्तकांच्या संग्रहाला महत्त्वपूर्ण चालना मिळाली.

एनफेज सोलर एनर्जीने, सलग दुसऱ्या वर्षी, तेलंगणामध्ये २०० ग्रंथालये स्थापन करण्यासाठी पाठिंबा दिला.

पानी फाउंडेशन आम्हाला २०१२पासून नवीन आशयावर आधारित नवीन पुस्तके विविध भाषांमधून निर्माण करण्यास मदत करते आहे. यावर्षीदेखील आम्ही त्यांच्या मदतीने ५ भाषांमध्ये ३ नवी पुस्तके प्रसिद्ध केली.

टाटा ट्रस्टसोबतदेखील आमचे काम २०१२पासून सुरू आहे. त्यांच्या सहयोगामुळे आम्ही मराठी, कन्नड आणि इंग्रजी या भाषांमध्ये सहा पुस्तके तयार करू शकलो. त्याच्या ३०,००० प्रती छापून शाळेतील मुलांपर्यंत ती पोहोचवू शकलो.

नोव्हेंबर २०२२ मध्ये सुरू झालेल्या इंडस टॉवर्स प्रकल्पातून 'गोवा वाचतो आहे' हा उपक्रम सुरू झाला. शासकीय आणि शासकीय अनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची संस्कृती रुजवण्यासाठी सुरू झालेल्या या उपक्रमाचा दुहेरी उद्देश होता. इंग्रजी, मराठी आणि कोंकणी भाषांमध्ये डिजिटल वाचन उपक्रम राबवणे आणि लायब्ररी-इन-अ क्लासरूम (LIC) मॉडेल वापरून शाळांमध्ये वाचन कोपरे तयार करणे, हे उद्देश यात पुरे करण्यात आले.

या उपक्रमामुळे १,२०० शाळांपर्यंत पोहोचता आले आणि २,०१,६०० गोष्टींची पुस्तके वितरित करण्यात आली. त्यांचा लाभ ७८,८०० विद्यार्थ्यांना झाला. या कार्यक्रमाने भाषांतरित पुस्तकांचा संच, वाचन उपक्रम, शिक्षकांचे प्रशिक्षण आणि त्यांची क्षमता वाढवण्याचे काम केले. डिजिटल प्लॅटफॉर्म आणि छापील पुस्तकांचा संयुक्त उपयोग करून विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लावण्यात हा प्रकल्प यशस्वी ठरला.

फोटो १: बंगळुरूमधील अनेकल तालुक्यांमधील सरकारी शाळांमध्ये प्रथम बुक्सची ग्रंथालये सुरू केली.

फोटो २: गुजरातमधील वांकल येथील सरकारी शाळेतील मुलांना "लायब्ररी इन क्लासरूम्स"द्वारे वाचनाचा आनंद देताना.

चित्र ३: आसाममधील नागांव जिल्ह्यातील काथा कानन लायब्रीतील मुलं त्यांच्या नवीन वर्ग ग्रंथालयात.

चित्र ४: आसाममधील कामरूप (महानगर) जिल्ह्यात स्नेहजोरीच्या सहयोगाने शाळांमधील आणि समुदायातील मुलं, त्यांच्या प्रथम बुक्सच्या लायब्रीला भेट दिल्यामुळे उत्साहित.

प्रथम बुक्स : दोन दशकांचा उत्सव

जानेवारी २००४ मध्ये, "प्रत्येक मुलाच्या हाती एक पुस्तक" या दृष्टिकोनातून प्रेरित होऊन, प्रथम बुक्सने बालसहित्य प्रकाशन व्यवसायाला सुरुवात केली. संस्थापक रोहिणी निलेकणी म्हणतात :
"आम्हाला सर्व स्तरांतील मुलांमध्ये वाचनाचा आनंद पसरवायचा होता. आम्हाला सर्व भाषांमध्ये उत्कृष्ट, विविध प्रकारची पुस्तके तयार करायची होती. हे करत असताना आम्हाला शक्य त्या ठिकाणी स्थानिक आशयावर भर द्यायचा होता. आम्ही हे साध्य केले!"

दोन दशकांची साधना :

२० वर्षांपासून मुलांसाठीची समृद्ध वाचन परिसंस्था तयार करणे ही आमची अढळ प्रेरणा आहे. ही वाटचाल लेखक, भाषांतरकार, चित्रकार, शिक्षक, ग्रंथपाल, पालक, देणगीदार आणि वाचनप्रेमींच्या सहकार्याने आणि सर्जनशीलतेमुळे शक्य झाली आहे.

प्रथम बुक्सचे सहसंस्थापक अशोक कामत म्हणतात :

"२००४ मध्ये प्रकाशित झालेली आमची पहिली-वहिली पुस्तके पुढे कमीतकमी एक डझन वेळा पुनर्मुद्रित झाली आहेत. हजारो मुलांसाठी तर ती त्यांच्या आयुष्यातली पहिलीच पुस्तके होती. आम्ही ती सर्वांना परवडतील अशा किंमतीत, म्हणजे फक्त पाच रुपयांना उपलब्ध करून देऊ शकलो."

अडथळे दूर करणाऱ्या गोष्टी

प्रथम बुक्सच्या बहुभाषिक आणि समावेशक दृष्टिकोनाने कोट्यवधी मुलांना पुस्तके उपलब्ध करून दिली आहेत. विचारपूर्वक तयार केलेल्या चित्रपुस्तकांद्वारे आणि वर्गातील ग्रंथालयांच्या माध्यमातून आम्ही दुर्गम खेडेगावांमध्ये, डोंगराळ शाळांमध्ये आणि आदिवासी समुदायांमध्ये मुलांपर्यंत वाचनाचा आनंद पोहोचवला आहे.

प्रथम बुक्सच्या विश्वस्त सुझान सिंग म्हणतात, "प्रथम बुक्सने एक अनोखे प्रकाशनाचे मॉडेल विकसित केले आहे. हे बहुभाषिक, खिशाला परवडणारे आणि ओपन-सोर्स स्वरूपाचे आहे. जगभरातील लाखो मुले आता आमची पुस्तके मोफत वाचू शकतात."

आमचे नवोन्मेषशाली उपक्रम येथेच थांबलेले नाहीत, तर स्टोरीविव्हर, आमचा डिजिटल प्लॅटफॉर्म, जागतिक स्तरावर गोष्टी उपलब्ध करून देण्यात आमूलाग्र बदल घडवत आहे. प्रथम बुक्सच्या सहसंस्थापक रेखा मेनन म्हणाल्या : "आम्ही सुरुवातीपासूनच तंत्रज्ञानाची सामाजिक कल्याणासाठी उपयोग करण्याची ताकद ओळखली होती." आज, स्टोरीविव्हर अनेक भाषांमध्ये वाचकांपर्यंत पोहोचत आहे, साक्षरता प्राप्त करण्यातले आणि शिकण्यासाठीचे अडथळे पार करत आहे.

वाचनाद्वारे जीवनामध्ये परिवर्तन :

गेल्या दोन दशकांमध्ये, आम्ही गोष्टींच्या रूपाने कल्पनाशक्तीला प्रज्वलित करण्याची, सहानुभूती विकसित करण्याची आणि वाचनाविषयी आयुष्यभर टिकणारे प्रेम निर्माण करण्याची सामर्थ्यपूर्ण ताकद अनुभवली आहे. संस्थेचे अध्यक्ष आर. श्रीराम म्हणतात :

“लेखक, चित्रकार, भाषांतरकार, स्वयंसेवक, भागीदार, देणगीदार आणि पाठिंबा देणाऱ्या समुदायांचे आम्ही मन:पूर्वक आभार मानतो. तुम्ही केलेल्या योगदानांमुळे आम्हाला जगात सर्वदूर दुर्लक्षित आणि वंचित मुलांपर्यंत पोहोचता आले.”

आमची मूल्ये आणि आमचे भविष्य

जग वेगाने बदलत असताना, आमची मूलभूत तत्त्वे मात्र अढळ राहिली आहेत : आमचे ध्येय, आमची मूल्ये आणि नावीन्यपूर्ण कामावरची आमची निष्ठा. प्रथम बुक्स नेहमीच सहकार्य, समावेश, सर्जनशीलता आणि सह-अनुभूती या मूल्यांसाठी आपला हात पुढे करेल.

आपल्याला एकत्रितपणे पुढे जायचे आहे – यासाठी की, कोणतेही मूल पुस्तकांच्या आमूलाग्र बदलून टाकणाऱ्या परिवर्तनशील अनुभवापासून वंचित राहू नये.

देणगीदार

Azim Premji University

P-A-N-I Foundation
giving hope a chance

[e] enphase ENERGY

KEMIN
Compelled by Curiosity™

unicef
for every child

UST

indus TOWERS

Vereint für eine bessere Zukunft
Nitya Bal Vikas Deutschland e.V.

H T Parekh FOUNDATION

TATA TRUSTS

CLOUDERA

देणगीदार

अध्ययन क्वालिटी एज्युकेशन फाउंडेशन

आशाज्योती युएसए इन्कॉर्पोरेशन

ब्राइट फंड

एज्युकेशन अबव्ह ऑल (EAA)

एज्युकेशन इनिशिएटिव्ज प्रायव्हेट लिमिटेड

फायडॅलिटी एशिया पॅसिफिक फाउंडेशन

गिव्ह फाउंडेशन

गिव्ह फाउंडेशन इन्कॉर्पोरेशन युएसए

जॅस्मिन इन्फोटेक प्रायव्हेट लिमिटेड

किंग बदाऊन फाउंडेशन

कॅटरपिलर इंडिया इंजिनीअरिंग सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड

लाइब्रेरियन असोसिएशन

नवनीत फाउंडेशन

एनडीआर इन्विट मॅनेजर्स

पर्सिस्टंट फाउंडेशन

सौरमंडळ फाउंडेशन

शॉपीफाय कॉमर्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड

द ऑनलाइन गिव्हिंग फाउंडेशन

युकॅटापल्ट फाउंडेशन

युके ऑनलाइन गिव्हिंग फाउंडेशन

युनायटेड वे बंगळुरू

२०२३-२४ची स्वतंत्र देणगीदारांची यादी

वाचनाचा आनंद अधिक मुलांपर्यंत पोहोचवण्यासाठी तुम्हाला जर आमच्याशी सहयोग करायचा असेल तर कृपया पुढील लिंकवर संपर्क साधा : grants@prathambooks.org

वित्तीय अहवाल

Pratham Books

Balance sheet as at March 31, 2024

(Amount in Rupees)

Particulars	Sch No.	As at March 31, 2024 Amount	As at March 31, 2023 Amount
Liabilities			
Corpus Fund	1	11,47,17,119	10,11,68,543
Specified Fund	2	73,66,019	5,03,01,352
Current Liabilities	3	1,60,15,456	1,55,66,236
Provisions	4	46,26,718	41,07,473
Other advances	5	21,65,806	6,20,585
Total		14,48,91,118	17,17,64,209
Assets			
Fixed Assets	6	19,80,392	24,41,933
Deposits	7	6,46,43,096	9,63,56,774
Debtors	8	34,70,991	29,94,427
Loans and advances	9	23,06,917	10,57,771
Stock of Books		83,22,808	63,92,840
Cash in Hand		15,762	13,440
Cash at Bank	10	4,46,69,456	5,59,18,084
Specified Fund Receivable	11	1,30,000	2,60,003
Other Current Assets	12	3,31,696	63,29,737
Total		14,48,91,118	17,17,64,209

Significant Accounting Policies and notes to accounts 20

for Pratham Books

R Sriram
Chairperson

Suzanne Singh
Trustee

Bengaluru
September 20, 2024

As per our report of even date
for Singhvi Dev & Unni LLP
Chartered Accountants
Firm Reg No 003867S/S200358

Shashi Kumar H D
Partner
Membership No.: 235431
UDIN: 24235431BKEMXC5342

Bengaluru
September 20, 2024

Pratham Books

Income & Expenditure for the year ended March 31, 2024

(Amount in Rupees)

Particulars	Sch No.	As at March 31, 2024 Amount	As at March 31, 2023 Amount
Income			
Sale of Books	13	8,78,87,601	7,22,51,678
Donations received	14	89,15,192	79,73,670
Other Income	15	67,22,965	76,56,613
Income from Funds	16	4,48,99,969	7,96,43,198
Total (A)		14,74,25,727	16,75,25,159
Expenditure			
Book Development Expenses	17	2,91,23,267	2,80,32,882
Selling & Administrative Expenses	18	2,27,61,805	1,94,58,430
Staff Expenses	19	3,69,18,922	2,47,53,402
Promotional Expenses	20	2,47,544	3,94,861
Depreciation	6	5,97,825	6,37,604
Fund Expenditure	21	8,67,17,139	10,06,12,911
Total (B)		17,62,96,500	17,38,90,094
Excess of Income over expenditure (A-B)		(2,88,70,773)	(63,64,935)
Add:			
Opening Balance in Funds			
Opening Balance in Corpus Fund		10,11,68,543	8,65,63,766
Opening Balance in Specified Fund		5,03,01,352	7,17,35,207
Balance of Funds after appropriations			
Corpus Fund		11,47,17,120	10,11,68,543
Specified Fund		73,66,019	5,03,01,352
Total balance in Funds		12,20,83,139	15,14,69,895

Significant Accounting Policies and notes to accounts 30

for Pratham Books

R Sriram
Chairperson

Suzanne Singh
Trustee

Bengaluru
September 20, 2024

As per our report of even date
for Singhvi Dev & Unni LLP
Chartered Accountants
Firm Reg No 003867S/S200358
UDIN: 24235431BKEMXC5342

Shashi Kumar H D
Partner
Membership No.: 235431
UDIN: 24235431BKEMXC5342

Bengaluru
September 20, 2024

वित्तीय अहवाल

Pratham Books

Receipts and Payments account for the year ended March 31, 2024

(Amount in Rupees)

Particulars	Sch No.	Year ended March 31, 2024 Amount	Year ended March 31, 2023 Amount
Receipts			
Balance brought forward			
- Cash on hand		13,640	8,740
- Cash at bank		3,09,18,084	5,56,29,623
Sale of books	22	8,98,95,914	7,60,21,404
Donations	23	89,18,192	79,73,670
Other income	24	57,68,936	46,96,420
Specified Funds	25	4,68,22,889	7,90,20,218
Fixed Deposits - Withdrawn		19,03,21,224	11,57,24,894
Gratuity Fund (LIC)		1,42,313	-
Earnest Money Refund Received		-	72,141
Income Tax Refund - Received (TDS)		-	15,20,281
Total		40,58,08,872	34,29,72,096
Payments			
Book Development Expenses	26	3,68,14,910	3,06,72,715
Selling, Administrative Expenses and Promotional Expenses	27	2,23,51,149	1,87,58,201
Staff Expenses	28	3,94,13,621	3,35,82,798
Fund Expenditure	29	9,14,42,364	9,88,75,433
Fixed Assets Purchased		3,06,960	8,27,935
Fixed Deposits		18,76,17,047	11,13,88,813
Gratuity- LIC Policy		10,00,000	13,14,641
Specific Grant Balance Refund		1,75,302	7,24,246
Earnest Money/Security Deposit		-	81,000
Balance carried forward			
- Cash on hand		15,763	13,640
- Cash at bank		4,44,69,456	3,09,18,084
Total		40,58,08,872	34,29,72,096

Significant Accounting Policies and notes to accounts 30

UDIN: [illegible]
As per our report of even date
for Singhvi Dev & Unni LLP
Chartered Accountants
Firm Reg No 003867S/ S200036

for Pratham Books

[illegible]
Chairperson

Suparna Singh
Trustee

Shashi Kumar H D
Partner
Membership No.: 235431
UDIN: [illegible]

Bengaluru
September 20, 2024

Bengaluru
September 20, 2024

विश्वस्त मंडळ

नाव	पद	मंडळाच्या सभांसाठी किती वेळा उपस्थित	विश्वस्तांना मिळालेला मोबदला/ प्रतिपूर्ती
अशोक कामत	विश्वस्त	४	शून्य
हरित नागपाल	विश्वस्त	३	शून्य
मीनाक्षी रमेश	विश्वस्त	१	शून्य
एम. एस. श्रीराम	विश्वस्त	३	शून्य
परवीन वर्मा	विश्वस्त	२	शून्य
श्रीकांत नादमुनी	विश्वस्त	२	शून्य
सुझन सिंग	विश्वस्त	३	शून्य
आर. श्रीराम	अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय विश्वस्त	४	शून्य

संस्थेचे विश्वस्त वर्षभर संस्थेच्या कामाच्या विविध पैलूंमध्ये सक्रियपणे सहभागी होऊन औपचारिक बैठकींच्या पलीकडे जाऊन आपले योगदान देतात.

अशोक कामत सुरुवातीपासूनच सह-संस्थापक विश्वस्त म्हणून प्रथम बुक्सचा महत्त्वाचा घटक आहेत. ते 'अक्षरा फाऊंडेशन'चे नेतृत्व करतात. भारतातील शैक्षणिक असमानता दूर करण्यासाठी ते कटिबद्ध आहेत. विकासापूरक बदलांसाठी शाश्वत मॉडेल्स तयार करण्यात आणि ती मोठ्या प्रमाणावर राबवण्यासाठी सरकारच्या राज्य नेतृत्वापासून ते तळागाळापर्यंतच्या सर्व स्तरांशी सहयोग कसा साधावा हे अशोक यांच्याकडून शिकण्यासारखे आहे.

हरित नागपाल यांना व्यवसाय चालवण्याची मर्मदृष्टी आहे, तसेच संपूर्ण भारताच्या पातळीवरच्या व्यावसायिक कार्ययोजना राबवण्याचा अनुभव आहे. आमच्या या उपक्रमाला मोठ्या प्रमाणावर राबवण्यासाठी तत्कालीन वास्तव परिस्थिती समजून घेणे व वापरकर्त्यांची भूमिका समजावून घेणे यांसाठी ते मदत करतात.

परवीन वर्मा क्रायच्या (CRY) नेतृत्वपदी कार्यरत होत्या. मुलांच्या गरजा समजून घेण्याची सहवेदना आणि समज त्यांच्याकडे आहे. त्यामुळे मुलांपर्यंत कसे पोहोचायचे आणि पुस्तकांद्वारे त्यांवर कसा सकारात्मक प्रभाव टाकायचा यातील त्या तज्ज्ञ आहेत.

रेखा मेनन या संस्थापक विश्वस्त आहेत. कॉर्पोरेटमधील शिस्तबद्धता आणि समाजोपयोगी उद्देशांकडे वाटचाल या दोहोंचाही त्या सुरेख मेळ घालतात. त्या नेहमीच भविष्याचा आणि बदलांमुळे होणाऱ्या प्रभावाचा विचार करत असतात.

मीनाक्षी रमेश या युनायटेड वे चेन्नईच्या सीईओ आणि सिटीझन मॅटर्स या संस्थेच्या सहसंस्थापक आहेत. त्या २००१पासून प्रथम बुक्सबरोबर काम करत आहेत. एमएस युनिव्हर्सिटी बडोदा आणि आयआयएम अहमदाबाद इथून त्यांनी शिक्षण घेतले असून सध्या त्या चार स्वयंसेवी संस्थांच्या संचालक मंडळांवर कार्यरत आहेत.

एम. एस. श्रीराम हे शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असून ते नामवंत लेखकदेखील आहेत. ट्रस्टचे व्यवस्थापन करण्याचे व्यावहारिक मुद्दे आणि संकल्पनात्मक मुद्दे यांना गुंफून ते प्रगतीच्या दिशेने वाटचाल करण्यास मार्गदर्शन करतात.

श्रीकांत नादमुनी मुलांना तंत्रज्ञानाविषयक संकल्पना सोप्या भाषेत समजाव्यात यासाठी आपल्या तंत्रज्ञानाच्या सखोल ज्ञानाचा वापर करतात. त्यांनी स्वतः कार्यक्षेत्रात सहभागी होऊन हे काम केले आहे. तंत्रज्ञान आणि नावीन्यपूर्ण उपाययोजना राबवण्यामध्ये ते निपुण आहेत.

सुझन सिंग यांनी अनेक वर्षांपासून संस्थेचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय विश्वस्त म्हणून नेतृत्व केले आहे. स्टोरीविव्हरसोबतच इतर अनेक नवोन्मेषशाली कल्पनांची त्यांनी सुरुवात केली असून पुढे त्यांचा मोठ्या प्रमाणावर विस्तारही केला आहे. त्या नेहमी एकाग्रतेने काम करतात, त्यांचे प्रत्येक गोष्टीकडे बारीक लक्ष असते. त्यांचे एकच ध्येय आहे - प्रत्येक मुलाला पुस्तक वाचनाचा आनंद घेता आला पाहिजे.

आर. श्रीराम हे पुस्तकांबद्दल आणि वाचनाच्या आनंदाबद्दल अत्यंत उत्साहाने कार्य करत असतात. उद्योजक या भूमिकेतून ते आपली मते मांडत असतात. विविध व्यवसाय व ना-नफा संस्थासोबत केलेल्या कामांचा त्यांना प्रदीर्घ अनुभव आहे. आर. श्रीराम सध्या अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय विश्वस्त या भूमिकांमधून प्रथम बुक्सच्या टीमला मार्गदर्शन करत आहेत.

चित्रांकन श्रेय

शीर्षक	चित्रांकन	लेखक
पाऊस आला रे!	तस्मिन अमीरुद्दीन	संजीव जयस्वाल 'संजय'
माझे जवळचे मित्र	रिषभ बन्शकर	रमा हर्डिकर – सखदेव
अनुला काय काय दिसतं?	लावण्या कार्तिक	लावण्या कार्तिक
एक पुस्तक पुचकूसाठी	राजीव आईप	दीपांजना पाल
नानम्मल आणि कमलतलचा समुद्रप्रवास	सुशांत अहिरे	मेनका रमण
पावसाचं गाणं	राजीव आईप	माला कुमार आणि मनिषा चौधरी
अच्चचींची दप्तरछत्री	अथिय्या अशोक कुमार	अथिय्या अशोक कुमार
माझी पिवळी छत्री	पूजना प्रसन्न	पूजना प्रसन्न
मीरा आणि अमीरा	लावण्या नायडू	निम्मी चक्को
गरम चहा आणि दुलईची उब	प्रिया कुरियन	माला कुमार आणि मनीषा चौधरी
टिने आणि दूरवरचा पर्वत	ओगिन नयम	शिखा त्रिपाठी
चकट फू कुल्फी	अलंकृता अमाया	अलंकृता अमाया
अंतराळातले नियम	कनाटो जिमो	अपर्णा कपूर आणि बिजल वच्छरजानी
आज मी झाले आहे...	संध्या प्रभात	वर्षा शेषन
गब्बू मिंग-मिंग अस्वलाची गोष्ट	विष्णू एम नायर	जेरी पिंटो
घूम-घूम सुसरीची रोमांचक सहल	रॉश	अपर्णा कपूर
गोष्ट चिमुकल्या कीटकांच्या जगाची, राजमोहना केलोथ यांच्या संशोधनाची	जोआन डावल	श्वेता गणेश कुमार
आलेपाक	सिद्धी वर्तक	वसीमबारी मणेर

मुलांना वाचनाचा आनंद मिळण्यासाठी प्रथम बुक्स विविध भाषांमध्ये पुस्तकं तयार करत असते. मुले जेव्हा आपल्या मातृभाषेत लिहिलेली पुस्तके हातात घेतात, तेव्हा त्यांचा आनंद द्विगुणित झालेला दिसतो. त्यांचा आनंद बघून या वर्षीच्या अहवालात आम्ही विविध भाषांचा सन्मान केला आहे. त्यामध्ये आम्ही प्रकाशित केलेल्या पुस्तकांतून, विविध भाषांवरून प्रेरणा घेऊन, त्या त्या लिपींमधील अक्षरांचा प्रस्तुत अहवालाचे डिझाईन करताना समावेश केला आहे.

Pratham Books

#621, 2nd floor, 5th Main, OMBR Layout,
Banaswadi, Bengaluru 560043
T: +91 80 42052574 / 41159009
New Delhi | T: +91 11 41042483

www.prathambooks.org
www.storyweaver.org.in
www.donateabook.org.in